प्रकाशक : श्री. वि. सहस्त्रबुद्धे, सांगली
दिनांक ७-९-१९८५

॥ श्रीगुरुलिंग गीत ॥



गुहेमाजी नारायणे ।
दिली अंतरीची वचने ॥१॥
काय अभंगी प्रसाद ।
केला कानडयाने बोध ॥२॥
काय जाणोनी मराठी ।
अक्षरेची ठेवू ओठी ॥३॥
अवघाचि महाराजा ।
दासरामी कोण दुजा ॥४॥

साधकोपयोगी ग्रंथ

१) हनुमद् गुरुचरित्रबोधसार
२) श्रीरामपाठ आवृत्ती १-२
३) गोविंद कीर्तन गुणगान
४) श्रीगुरुतृतीया कथा
५) गोविंदचरितमानस
६) गोविंदस्मृती
७) श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज यांची चिन्मय यशोगाथा
८) श्रीदासराम गौरव ग्रंथ
९) अमृतवाणी
१०) चिन्मय नित्यपाठ
११) निंबरगीकरमहाराज चरित्र
१२) मामामहाराज केळकर चरित्र
१३) चिमडमहाराज चरित्र
१४) महानिर्वाण
१५) अमृतकुंभ



श्रीदासराममहाराजश्रुत

श्रीगुरुलिंगगीता

गुहेमाजी नारायणे । दिली अंतरीची वचने ॥ १ ॥
काय अभंगी प्रसाद । केला कानडयाने बोध ॥ २ ॥
काय जाणोनी मराठी । अक्षरेची ठेवू ओठी ॥ ३ ॥
अवघाचि महाराजा । दासरामी कोण दुजा ॥ ४ ॥

प्रकाशक– श्री. वि. सहस्रबुद्धे
सांगली
दिनांक ७–९–१९८५

• प्रकाशक :-

श्री. वि. सहस्रबुद्धे

सहस्रबुद्धे वाडा,
सिटी हायस्कूल रोड, गांवभाग, सांगली ४१६ ४१६
सर्व हक्क संकलकाचे स्वाधीन

• प्रकाशन दिन :-

श्रावण वद्य अष्टमी, शके १९०७,
गोकुळअष्टमी, शनिवार दि. ७-९-१९८५

• मुद्रक :-

श्री. वि. श्री. देवधर,

माधव प्रिंटींग प्रेस,
सोमवार पेठ, तासगांव ४१६ ३१२

• खाजगी वितरणासाठी

अनुक्रम

प्रकाशकाचे मनोगत १–८

प्रस्तावना १–१४

श्रीनिंबरगीकर महाराजांचा फोटो

श्रीगुरुलिंगगीता मराठी अर्थ, इंग्रजी पदांचा अर्थ १–२८

श्रीदासराम महाराजांचा फोटो

विभाग १ : नित्यपाठगीता

काकडारती

श्रीगुरुलिंगगीता १–२९

शतनामगीता ३०

सहस्रनामगीता ३१–३२

सिद्धस्तुतिगीता ३३–४४

भजनगीता ४५

शेजारती ४६

विभाग २ : जपगीता

दशनामगीता ४७

अर्धसहस्रनाम (अथवा चतुराक्षरी) गीता ४८–४९

द्वादशसहस्रनामगीता ५०–५३

त्रयोदशसहस्रनामगीता ५४–५५

नित्यजपगीता ५६

विभाग ३ : इंग्रजी गीता

God's Message ५७–५८
Work Done ५९
Twinkle Twinkle ६०–६२

विभाग ४ : त्रयोदशगीता

मंत्रन्यासगीता ६३
हृदयगीता ६४
स्वरगीता ६५–६६
शिवगीता ६७–६८
अक्षरगीता ६९–७०
प्रणवगीता ७१–७२
अमृतध्वनिगीता ७३–७५
सूर्यनारायणगीता ७६–७७
नामगीता ७८–८०
मंत्रगीता ८१–९६
स्मरणगीता ९७–१०९
प्रसादबोधगीता ११०–१३३
जयजयकार गीता १३४–१४४
त्रयोदशगीतामाहात्म्य १४५
श्रीनिंबरगीकरमहाराजांची आरती १४६
श्रीगुरुलिंगगीतेची आरती १४७
श्रीगुरुलिंगगीता–प्रशस्ति: १४८
सूची १–१०

प्रकाशकाचे मनोगत

श्रीगुरुलिंगगीता हा प्रासादिक ग्रंथ परमार्थप्रेमी साधक पुरुषांच्यापुढे प्रस्तुत करताना मला आनंद होत आहे.

ही श्रीगुरुलिंगगीता श्रीनिंबरगीकरमहाराजांनी श्रीरामराय गोविंद केळकर उर्फ श्रीदासराममहाराज तथा श्रीदादामहाराज यांना 'श्रुत' केली. निंबरगीकरमहाराज हे गेल्या शतकात कर्नाटकात होऊन गेलेले एक महान् सत्पुरुष होत. त्यांचे पट्टशिष्य श्रीरघुनाथ-प्रियसाधुमहाराज. साधुमहाराजांचे शिष्योत्तम श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर उर्फ चिमडमहाराज. चिमडमहाराजांचेकडून श्रीतात्यासाहेब-महाराज कोटणीस यांना उपदेश मिळाला. तात्यासाहेबमहाराजांनी श्रीदासराममहाराजांच्यावर वयाच्या चौदाव्या दिवशी दृष्टिद्वारा कृपानुग्रह केला. श्रीनिंबरगीकरमहाराजांचे नातू श्रीनागाप्पाण्णा-महाराज हे परमाधिकार संपन्न होते. त्यांच्या वचनाप्रमाणे निंबरगीकरमहाराजांनी श्रीदासराममहाराजांना 'श्रुत' केलेला पदांचा संग्रह म्हणजेच प्रस्तुतची श्रीगुरुलिंगगीता आहे.

ही गुरुलिंगगीता ज्या श्रीदासराममहाराजांना मिळाली त्यांचा श्रेष्ठ पारमार्थिक अधिकार प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेत सविस्तर व्यक्त झाला असल्याने मी त्याची पुनरावृत्ति येथे करीत नाही. आमचे श्रीदादामहाराज नेहमी म्हणतात की गुरुलिंगगीता म्हणजे श्रीनिंबरगीकरमहाराज. त्या रूपाने निंबरगीकरमहाराज आजही

आपल्यामध्ये आहेतच. अशी ही संपूर्ण गुरुलिंगगीता प्रकाशित करण्यास श्रीदादामहाराजांनी मला परवानगी दिली हे माझे मोठे भाग्यच आहे.

प्रारंभी गुरुलिंगगीतेतील पदे श्रीदादांनी आपल्यापुरतीच ठेवली होती. तथापि त्यांच्या चिरपरिचयात असणाऱ्या श्री. मा. वि. गोसावी यांना या कानडी पदांचा पत्ता लागला आणि गोसावी व इतर काहीजण यांनी ही गुरुलिंगगीता उतरवून घेतली व तिचे ते पठण करू लागले. ही गीता निष्ठापूर्वक वाचणाऱ्यांमध्ये श्रीदादांचे निष्ठावंत कै. नामदेव मोरेश्वर कुलकर्णी हे अग्रणी होते.

ही गुरुलिंगगीता सर्वप्रथम 'हंस' साप्ताहिकाच्या द्वारा प्रकाशात आली. त्याचे असे झाले. इ.स. १९३८ च्या पौष शुद्ध नवमीला श्रीदासरामांना उर्फ श्रीदादांना 'येनू इल्लदानू' हे पद निंबरगीकरमहाराजांनी 'श्रुत' केले. त्यानंतर अधिकाधिक पदे मिळत गेली. १९४३ सालापर्यंत 'प्रगटादा गुरु प्रगटादा' येथपर्यंतची २६ पदे झाली व त्यांचा अर्थही प्राप्त झाला. ही पदे व त्यांचा अर्थ ऐकल्यावर वेदमूर्ती श्री. द. वा. बेडेकर हे अगदी भारावून गेले. 'ही गीता प्रकाशात आलीच पाहिजे' असे त्यांच्या मनाने घेतले. त्यावेळी ते सातारच्या वर्णाश्रम स्वराज्य संघ या संस्थेचे प्रचारक होते. या संघाचे 'हंस' नावाचे साप्ताहिक सातारा येथे प्रसिद्ध होत असे. त्या 'हंस' मध्ये गीतेची पदे व अर्थ प्रकाशित करण्यास श्री. बेडेकरांनी पाठवून दिले. 'हंस' च्या वर्ष ११, अंक १५, दि. १८-११-१९४३, वर्ष ११, अंक १६, दि. २-१२-१९४३, व वर्ष ११, अंक १७, दि. १६-१२-१९४३ या अंकांत या गीतेचे २४ अभंग प्रकाशित झाले. तेथे 'जगवू मुट्टीवू' आणि 'जगदानुद्धरणादी' हे दोन अभंग मात्र काही कारणाने छापले गेले नव्हते. तसेच 'सिद्धानंदरूपन्ने', 'ओळगितादू', 'हरवेयू नारायण', 'प्रगटादा गुरु', आणि 'मोदलू श्रीसोमेश्वरू' या

अभंगांचा क्रमांकही चालू क्रमांकापेक्षा वेगळा होता. या गीतेच्या प्रारंभी श्री. बेडेकरांनी 'परिचय' या शीर्षकाखाली 'प्रल्हाद' व 'दासराम' यांची महती सांगितली होती आणि बहुतेक पदांच्या संदर्भात प्रसंग, वेळ इत्यादिही दिले होते.

इ. स. १९४३ नंतरही श्रीदादांना कानडी पदे 'श्रुत' होत राहिली. इ. स. १९४८ पर्यंत ही पदे ६५ झाली. इ.स. १९४८ मध्ये निंबरगीकरमहाराजांचे अधिकारी पणतू श्रीगुरुसिद्ध्यामहाराज यांनी श्रीदादांना 'नमो नमो गुरुलिंगजंगमेशा' हे पद दिले. ते धरून ६६ पदे झाली. त्यांचे जोडीला काकडारती व शेजारती होत्या. ही ६६ पदे श्री. व. म. बापट, श्री. धनंजय भावे, श्री. प्रकाश भावे, श्री. वासुदेवराव जोशी, श्री. बापूराव जोशी, श्री. सावंत फौजदार इत्यादि मंडळी रोज म्हणत असत. सौ. सुमनताई आपटे यांना तर गुरुलिंगगीतेची ६६ कानडी पदे केवळ आठ दिवसांत पाठ झाली आणि त्यांनी गुरुलिंगगीतापठणाचा क्रम सुरू केला व तो जगाचा अखेरचा निरोप घेईपर्यंत टिकवून धरला आणि सौ. सुमनताई निंबरगीकर महाराजांच्या पायाशी जाऊन बसली असे श्रीदादा म्हणतात हे लक्षणीय आहे.

त्यावेळी इतर अनेकांनाही गुरुलिंगगीता रोज म्हणावी असे वाटत असे पण ती पुस्तकरूपाने उपलब्ध नव्हती. अशावेळी श्री. वसंत म. बापट यांनी निष्ठापूर्वक अनेकांना गुरुलिंगगीतेच्या प्रती स्वहस्ताने लिहून दिल्या. नंतर ही अडचण दूर करण्यास श्री. वासुदेवराव जोशी यांनी इ. स. १९५३ मध्ये ही ६६ पदे ग्रंथरूपाने प्रकाशित केली. या ग्रंथात प्रारंभी काकडारती आणि शेजारती होती. 'नमो नमो गुरुलिंगजंगमेशा' हे पद प्रथम क्रमांकावर होते. 'हंस' मध्ये प्रकाशित होताना गाळली गेलेली 'जगवू मुट्टीवू' आणि 'जगदानुद्धरणादी' ही पदे ६ व ७ या क्रमांकावर आली.

आणि 'ओळगिंतादू' चा क्रमांक २२, 'सिद्धानंदरूपन्ने' चा क्रमांक २३, 'मोदलू श्रीसोमेश्वरू' चा क्रमांक २५, 'हरवेयू नारायण' चा क्रमांक २६, आणि 'प्रगटादा गुरु' चा क्रमांक २७ झाला. यानंतर पठणात हाच क्रम राहिला. या पुस्तकात 'हृद्गत', 'प्रास्ताविक' व 'प्रकाशकाचे चार शब्द' हा प्रारंभिक भाग असून, मुखपृष्ठावर 'गुहेमाजी नारायणे' हे पद व शेवटी श्रीदासराममहाराजकृत निंबरगीकरमहाराजांची आरती आणि श्री. के. वा. आपटेकृत गुरुलिंगगीतेची आरती होती. तसेच 'गुरुलिंगगीतामृत' या शीर्षकाखाली ६६ पदांचा साररूपाने अर्थ होता आणि संपूर्ण गीतेला 'श्रीगुरुलिंगप्रसादगीता' असे शीर्षक होते.

वरील पुस्तक प्रकाशित झाल्यानंतरही श्रीदादांना कानडी, संस्कृत, मराठी व इंग्रजी या भाषांत पदे 'श्रुत' झाली. इ. स. १९८५ पर्यंत पहिली ६६ पदे धरून एकूण पदसंख्या आता २२८ झाली. त्यांतील काही पदे 'सिद्धस्तुति' या शीर्षकाखाली इ. स. १९७७ मध्ये प्रकाशित झाली. तथापि एकूण २२८ पदे एकत्रितपणे प्रकाशित होणे आवश्यक होते आणि म्हणून ही सर्व पदे 'श्रीगुरुलिंगगीता' या सुटसुटीत शीर्षकाखाली श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या निर्याणशताब्दी वर्षात प्रकाशित करण्याची कल्पना मला आली. ही कल्पना मी श्री. म. वि. गाडगीळ, श्री. यशवंत आपटे, श्री. केशवराव आपटे यांच्याजवळ प्रगट केली. त्यांना ती फारच आवडली. आणि हे पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरले.

प्रस्तुत पुस्तकात एकूण २२८ पदे मुद्रित करताना सोईसाठी त्यांचे पुढीलप्रमाणे विभाग करण्यात आले आहेत. पहिल्या "नित्यपाठगीता" विभागात ६६ पदे असणारी गुरुलिंगप्रसादगीता, शतनामगीता, सहस्रनामगीता, सिद्धस्तुतीगीता, भजनगीता, शेजारती दिल्या आहेत. या सर्व गीता श्रीदादा नित्य म्हणतात. दुसऱ्या 'जपगीता' विभागात,

दशनामगीता, अर्धसहस्रनामगीता, द्वादशसहस्रनामगीता त्रयोदश-सहस्रनामगीता व नित्यजपगीता समाविष्ट आहेत. हातात माळ न घेता ज्यांना तालासुरात जप करावयाचा असेल त्यांना या गीता अत्यंत उपयुक्त आहेत. तिसऱ्या 'इंग्रजी गीता' विभागात इंग्रजीतील तीन प्रदीर्घ काव्ये आहेत. आणि चौथ्या ' त्रयोदशगीता ' विभागात उरलेल्या तेरा गीता दिल्यावर मग ' त्रयोदशगीता माहात्म्य ' दिलेले आहे. तसेच मागच्या आवृत्तीतील काकडारती, शेजारती, निंबरगीकर महाराजांची आरती व गुरुलिंगगीतेची आरती हा भागही अंतर्भूत केला आहे. मुख्य म्हणजे गुरुलिंगप्रसादगीतेच्या ६६ पदांचा संपूर्ण अर्थ व इंग्रजी काव्यांचा अर्थ दिलेला आहे. आणि शेवटी इंग्रजी पदे सोडून अन्य सर्व पदांची सूची दिलेली आहे. ' हंस ' साप्ताहिकात ज्यावेळी ही गुरुलींगगीता छापली गेली त्यावेळी काही पदांचे प्रसंग, वेळा इत्यादि दिलेले होते. पुढे मिळालेल्या अनेक पदांच्या बाबतीत अशा नोंदी नसल्याने, पदांचे प्रसंग वगैरे येथे दिलेले नाहीत तसेच योगायोगाची गोष्ट अशी : १९५३ च्या गुरुलिंगगीतेत श्रीदादांचे निष्ठावंत डॉ. के. वा. आपटे यांनी प्रास्ताविक लिहिले होते त्यांचीच नवीन स्वरुपातील प्रस्तावना आम्हाला मिळाली. तीही येथे दिली आहे. तसेच डॉ. के. वा. आपटेकृत श्रीगुरुलिंगगीता-प्रशस्तिः शेवटी घातलेली आहे.

प्रतिवर्षी वैशाख वद्य ७ हा दिवस प्रस्तुत गुरुलिंगगीतेचा जयंती–दिन साजरा करण्याची पद्धत इ. स. १९४९ पासून प्रचारात आली. वास्तविक पहाता गुरुलिंगगीतेचा पहिला अभंग पौष शुद्ध नवमीला मिळाला असल्याने, तोच दिवस खरे म्हणजे जयंतीदिन म्हावयास हवा होता पण वैशाख वद्य सप्तमी हा जयंतीचा दिवस होण्यास पुढील कारण घडले: इ. स. १९४८ मध्ये श्रीगुरुसिद्ध्या–महाराज हे सांगलीला श्रीदादांच्याकडे आले होते. ' नमो नमो गुरुलिंगजंगमेशा ' हे त्यांचे पद अपूर्ण असून काही केल्या ते पूर्ण होत

नव्हते. शनिवार दि. २९-५-४८ (वैशाख वद्य ६, शके १८७०) रोजी श्रीदादांच्या इच्छेप्रमाणे निंबरगीकरमहाराजांच्या प्रेरणेने हे पद पूर्ण झाले. दुसरे दिवशी म्हणजे वैशाख वद्य सप्तमी, शके १८७० (रविवार, दि. ३०-५-४८) या रामराज्याभिषेकदिनी गुरुसिद्दप्पामहाराजांनी ते संपूर्ण पद गुरुलिंगगीतेत घालणेस परवानगी दिली. आणि त्यांनी श्रीदादांच्या गुरुलिंगगीतेच्या हस्त-लिखित वहीत हे पद कानडी लिपीत लिहून दिले. तेव्हा गुरुसिद्दप्पा महाराजांना श्रीदादा म्हणाले, " महाराज, आम्ही या पुढे आजचा म्हणजे वैशाख वद्य ७ हाच गुरुलिंगगीताजयंतीचा दिवस मानणार त्यास आपण मान्यता द्यावी. " गुरुसिद्दप्पामहाराजांनी आनंदाने संमती दिली तेव्हापासून वैशाख वद्य ७ हाच गुरुलिंगगीताजयंतीचा दिवस मानला जाऊ लागला.

प्रस्तुत गुरुलिंगगीता ही किती महत्वाची आहे हे पुढील दोनतीन घटनांवरुन स्पष्ट होते:

सुप्रसिद्ध संत श्रीसाईबाबा यांचे पुणे येथील अधिकारी शिष्य ह. भ. प. किसनराव महाराज यांनी 'यांतील अभंग ही श्रुतीच आहे.' असे उद्गार काढून चिमड संप्रदायाबद्दल निष्ठा असलेले श्री. एन. डी. लिमये यांचेकडून उतरुन घेतली.

सुप्रसिद्ध संत श्रीमाणिकप्रभू महाराज यांच्या निष्ठावंत भक्त व श्रीचिमड परंपरेबद्दल आदर बाळगणाऱ्या पालघर येथील श्रीमंत मातोश्री माईसाहेब दांडेकर यांना ही गुरुलिंगगीता फार आवडली.

ही गुरुलिंगगीता मिळाल्यानंतर श्रीदादामहाराज एकदा श्री गणपतराव कानिटकर यांच्याबरोबर औदुंबरला जाण्यासाठी भिलवडी स्टेशनवर उतरले होते. स्टेशनवरच रहाणारे श्री रामू महाराज हे विदेही साधू त्याना भेटले व त्यांनी आपल्या पद्धती-प्रमाणे श्रीदादांच्या खिशातून १ आणा काढून घेतला. ज्याच्या बाबतीत

ते असे करीत त्याचे कल्याण होई अशी त्यांची प्रसिद्धी होती. त्यांना श्रीगणपतरावांनी विचारले " दादांना गुरुलिंगगीता मिळालेली आहे ती कोणी दिली ?" तेव्हा ते म्हणाले, ' भगवान शंकरानी दिली.' यावरुन या गुरुलिंगगीतेचे महत्व काय आहे हे स्पष्ट होते.

श्री. वासुदेवरावांकडून ही गुरुलिंगगीता मुद्रित झाल्यावर सांगलीचे श्रीरामभाऊ साळुंखे निंबरगीला गेले होते व तेथे त्यांनी ही गीता–ज्यांच्या वचनाने ही गुरुलिंगगीता मिळाली त्या–श्रीनागाप्पाण्णामहाराजांच्यापुढे पठण करुन दाखविली. ते ऐकून श्रीनागाप्पाण्णामहाराजांना अतिशय आनंद झाला.

प्रस्तुत पुस्तक प्रकाशित करण्याची कल्पना मला जानेवारी ८५ च्या मध्यास सुचली. मी लगोलग त्यासाठी दादांची अनुमती मागितली व ती त्यांनी दिली. त्याबद्दल मी त्यांच्याच ऋणात राहू इच्छितो. लगेच सर्व पदांची मुद्रणप्रत करण्याचा विचार झाला त्यातील पहिल्या ६६ पदांची झेरॉक्स प्रत श्री. दिलीप पाटणकर यांनी श्रीदादांच्यावरील भक्तीने विनामूल्य करुन दिली. उरलेल्या सर्व पदांची मुद्रणप्रत श्री. यशवंत आपटे यांनी फार झटपट तयार केली या दोघांचाही मी कृतज्ञ आहे.

कच्ची मुद्रिते तपासून जास्तीत जास्त बिनचूकपणा आण–ण्याचे कामी श्री. यशवंत आपटे, श्री. पां. सी. गोखले, श्री. चंद्रशेखर केळकर, श्री. मुकुंदराव सहस्रबुद्धे, श्री. वामनराव सहस्रबुद्धे, श्री. अनिलप्रभू केळकर, डॉ. के. वा. आपटे यांचे अनमोल साहाय्य झाले. त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. त्याचप्रमाणे श्री. डी. व्ही. जोशी यांनी प्रुफांचे महत्वाचे काम आपलेपणाने केले त्यांचाही मी आभारी आहे.

प्रस्तुत गुरुलिंगगीतेच्या मुद्रणाचे काम माधव प्रिंटींग प्रेस, तासगांव या मुद्रणालयाने फार चांगले केले आहे. सबब

मुद्रणालयाचे सर्व कर्मचारी आणि व्यवस्थापक श्री. बंडोपंत देवघर व श्री. गणपुले यांचा मी आभारी आहे.

श्रीदादांच्याजवळ संपूर्ण गुरुलिंगगीता ६६ पदांसहित प्रकाशित व्हावी अशी इच्छा सौ. गीतादेवी जोग, सौ. शैला भिडे, श्री. शरद आपटे व इतर अनेकजणांनी प्रदर्शित केली होती. स्थलअभावी सगळ्यांची नावे देणे शक्य नाही. ती इच्छा आता पुस्तकरुपाने फलद्रुप होत आहे. हे श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या कृपेचे फळ आहे असे मला वाटते.

आमच्या या प्रकाशन कार्याला निंबरगीकरमहाराजांचे पणतू श्रीगुरुसिद्दप्पामहाराज यांचा आशिर्वाद आहेच. ज्या निंबरगीकर-महाराजांच्या कृपेने व ज्या श्रीदादामहाराजांच्या आशीर्वादाने प्रस्तुत गुरुलिंगगीतेच्या प्रकाशनाचे कार्य सुव्यवस्थितपणे पार पडले, त्या उभयतांच्या चरणी सादर प्रणाम करुन मी हे माझे मनोगत संपवितो.

श्रावण वद्य अष्टमी,
गोकुळअष्टमी, शके १९०७
शनिवार, दि. ७।९।१९८५
सांगली.

श्री. वि. सहस्त्रबुद्धे

—

प्रस्तावना

भारतीय कर्मवादानुसार प्राप्त होणाऱ्या पुनर्जन्माच्या सिद्धांताप्रमाणे माणसाला पूर्वजन्मीचे संस्कार वर्तमान जन्मात प्राप्त होतात आणि ते जागृत होऊन क्रियाशील होतात. त्यामुळे ज्याने पूर्वजन्मी परमार्थाचा आचार केला असेल त्याला पुढील जन्मात उपजताच परमार्थाची प्राप्ति होणार. उपजताच पारमार्थिक अधिकार प्राप्त झालेल्या सत्पुरुषांमध्ये श्रीरामराय गोविंद केळकर ऊर्फ श्रीदासराममहाराज तथा श्रीदादामहाराज यांचा अंतर्भाव होतो. ही गोष्ट स्पष्ट करणाऱ्या अनेक बाबी श्रीदादांच्या जीवनात दिसून येतात. आणि त्यांचा असा अधिकार असल्यानेच त्यांना श्रीगुरुलिंगगीता 'श्रुत' झाली.

संतकुळात जनन :

सांगली गावात निवास करणाऱ्या व भक्तीने भारलेल्या केळकर नामक कुळात श्रीदादांचे जनन झाले. त्यांचे आजोबा अंताजीपंत हे शिवोपासक असून ते नित्य पार्थिव पूजा आणि ॐ नमः शिवाय या षडक्षरी मंत्राचा जप करीत. अंताजीपंतांचे चिरंजीव म्हणजे श्रीबापूरावजी ऊर्फ मामामहाराज होत. ते आत्म-साक्षात्कारी संत होते. त्यांनी रामनामाची पुरश्चरणे केली आणि तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या आज्ञेने त्यांनी अडतीस वर्षे प्रतिदिनी अखंड हरिकीर्तन केले. त्यांच्या पत्नी सौ. इंदिराबाई.

त्या श्रीदादांच्यावेळी गर्भवती असताना त्यांना तात्यासाहेबमहाराज कोटणीसांचा अनुग्रह झाला. त्यांचे माहेर कुरुंदवाड या गावचे. कुरुंदवाड गावाजवळील औरवाड गावातील वजीरबाबा या अवलिया साधूंनी 'सौ. इंदिराबाईंना होणारा पुत्र हा महान् विष्णुभक्त होणार', असे भविष्य सौ. इंदिराबाईंच्या मामांजवळ वर्तविले होते. अशा या इंदिरा–गोविंद दांपत्याचे तेजस्वी भक्तरत्न अपत्य म्हणजे श्रीदादा.

बाराव्या दिवशी अनुग्रह :

श्रीदादांचे 'राम' हे नाव श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीसांच्या आदेशानुसार ठेवण्यात आले. 'राम' चवदा दिवसांचा असताना, तात्यासाहेबमहाराज कुरुंदवाडास आले होते. त्यांनी 'रामा'ला आपल्या मांडीवर घेतले आणि 'आहेच मुळी हा राम आमचा', असे उद्‌गार काढले. नंतर त्यांनी 'रामा'च्या मस्तकावरून आपला कृपाकर फिरवून, 'रामा'च्या दृष्टीला दृष्टि भिडवून, त्याचेवर दृष्टिद्वारा कृपानुग्रह केला. आणि ते भविष्यवचन बोलले "आमचा राम बालपणापासून कीर्तन करू लागेल."

बालवयातील आचार :

श्रीदादा वयाच्या पाचव्या वर्षापासून सांप्रदायिक साधन करु लागले, आणि परमार्थ स्पष्ट करणारी कीर्तनेही करू लागले. देवाची पूजाअर्चा करणे, देवाची पालखी काढणे आणि भजन करणे हे त्यावेळचे त्यांचे छंद होते. वयाच्या सातव्या वर्षीच त्यांना "आत्मयाची काव्यस्फूर्ति" होऊन, त्यांचे हातून पारमार्थिक काव्यरचना होऊ लागली. आणि नवव्या वर्षीपासून त्यांनी रामनामाचा दैनिक तेरा हजार जप सुरु केला.

बालकीर्तनकार प्रल्हाद :

श्रीदादा ज्या घरात रहात त्याच्या पुढल्या भागात बाबाण्णा सोनार नावाचे गृहस्थ रहात असत. त्यांच्याकडे श्रीरामानंद-

महाराज खटावकर हे संत येत असत. श्रीदादांची लहान वयातील कीर्तने त्यांना ऐकण्यास मिळाली. ती ऐकून ते इतके खूष झाले की त्यांनी या बाल कीर्तनकाराला प्रल्हाद हे नाव दिले. अनेकदा तर असे होई: रामानंदमहाराज प्रवचन करीत असताना श्रीदादा जर तेथे गेले तर रामानंदमहाराज आपले प्रवचन बंद करीत व श्रीदादांना कीर्तन करण्यास सांगत.

सिद्धानंद प्रगटले :

एकदा असेच श्रीदादांचे कीर्तन चालू होते. रामानंदमहाराज श्रवण करीत होते. अचानक कीर्तनस्थानी अपूर्व परिमळ दरवळला. कीर्तनानंतर रामानंदमहाराजांनी सांगितले "या प्रल्हादाच्या चिमडसंप्रदायाचे आद्य प्रवर्तक श्रीनिंबरगीकरमहाराज हे आत्ता सिद्धानंदरूपाने प्रगट झाले होते. त्यांच्या आगमनाने अद्‌भुत सुगंध सुटला होता."

निंबरगीकरमहाराजांचे दर्शन :

श्रीदादांच्या आत्याबाई श्रीमती गंगूताई पटवर्धन. त्यांचे एक नातेवाईक वासुनाना छापखाने सातारा गावी रहात. नारायणराव आणि हरिभाऊ या आपल्या आतेबंधूबरोबर श्रीदादा कधी कधी सातारला जात. इ. स. १९३७ साली श्रीदादा असेच सातान्यात असताना, दि. ११-६-१९३७ रोजी त्यांना स्वप्नात तात्यासाहेब-महाराज कोटणीस आणि आणखी एक सत्पुरुष दिसले. "रामा, ज्यांना तुम्ही लोक निंबरगीकरमहाराज म्हणता तोच मी", असा त्या दुसऱ्या सत्पुरुषांनी आपला परिचय श्रीदादांना करून दिला. रेवणसिद्ध, मरुळसिद्ध आणि काडसिद्ध या सिद्धसंप्रदायातील एक श्रेष्ठ संत श्रीनारायणराव भाऊसाहेबमहाराज हे निंबरगी गावी रहात असल्याने ते निंबरगीकरमहाराज या नावाने प्रसिद्ध होते. त्यांच्या रघुनाथप्रियसाधुमहाराज या पट्टशिष्याचे समाधिमंदिर

श्रीक्षेत्र चिमड येथे असून तेथे प्रतिवर्षी साधुमहाराजांचा रथोत्सव होतो. निंबरगीकरमहाराजांचे अधिकार संपन्न नातू श्रीनागाप्पाण्णा महाराज हे चिमड येथील रथोत्सवास येत असत.

पारमार्थिक काव्यरचना :

इ. स. १९३८–३९ पर्यंत श्रीदादांची जी अध्यात्मपर काव्य-रचना झाली तीवरूनही श्रीदादांच्या अधिकाराचा बोध होतो. श्रीरामानंदमहाराजांच्या सूचनेनुसार, त्यांनी वयाच्या नवव्या वर्षी रचलेल्या 'श्रीरामदास बोध' ग्रंथातील पुढील साक्षात्काराचे वर्णन पहावे: प्रथम पाजळलेल्या ज्योती। मग पहाता दिसती मोती ॥ ...मग पहाता दिसेल चांदणी। आणि नवरत्नांची खाणी। तेज सुंदर चहूकोनी। दिसेल गा ॥ कस्तुरीचा घमघमाट। अनुभवासी येतसे ॥...आनंदे दशविध नाद ऐकिले। मंजुळसे ॥ मग जी होय सुखप्राप्ती। यालाच बोलती मुक्ती ॥ त्यांची पद–अभंग–रचनाही त्यांचा अधिकार दाखवून जाते. त्यातील पुढील भाग लक्षणीय आहे. निश्चळ ते ब्रह्म चंचळ ते माया ॥ मायेचे उदरी ब्रह्म ते जन्मले। जीव शिव नाम पावले वो ॥ ब्रह्म पहाता माया माया पहाता ब्रह्म। कोण दासराम वेगळाला ॥ नाम तेचि ब्रह्म नाम तेचि ब्रह्म ॥

श्रीदादांच्या अधिकाराला मान्यता :

श्रीदादांचा हा जो अधिकार, त्याचा आविष्कार किंवा उच्चार निंबरगीकरमहाराजांनी गुरुलिंगगीतेत पुढीलप्रमाणे केला आहे :–

हे प्रल्हादा, स्वयंभू शिवस्वरूप हा तुझा गाभाच आहे. (गुलिंगी, १७·११); हे प्रल्हादा, गुरुलिंगजंगमांचे ठिकाणी तू परिपूर्णच होतो आहेस (गुलिंगी, १२·५); ब्रह्मांडाचे ठिकाणी असणारा अनाहत ऐकून, त्याचा ग्रास करून, हे प्रल्हादा, तुझे ठिकाणी शिवाच्या कृपेने घनानंद निर्माण झाला आहे (गुलिंगी, २३·४);

मी-तू-पणा सरल्याने दासराम मुक्त स्थितीत गेला (गुलिगी, ८·४); हरिस्वरूपात एकरूप होऊन, त्या तत्त्वाशी तू समरस झाल्याने, तुझ्या जन्माचे सार्थक झाले आहे (गुलिगी, ७·२). (आणखी पहा :–गुलिगी, ४·४, ३२·३, २४·४, १०·३, १४·४, १५·५, २०·४–५, ७·१, १३·३).

श्रीनागाप्पाण्णामहाराजांचा आशिर्वाद :

असे अधिकार संपन्न श्रीदादा इ.स. १९३८–३९ च्या सुमारास साधुमहाराजांच्या रथोत्सवासाठी चिमड क्षेत्री गेले. तेथे माईसाहेब यरगट्टीकर या आपल्या मातोश्रींच्या सूचनेवरून, चिमडमठाधिपति श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांनी कार्तिक प्रतिपदेला श्रीदादांचे कीर्तन आयोजित केले. कीर्तनास निंबरगीकरमहाराजांचे नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज उपस्थित होते. श्रीदादांचे कीर्तन ऐकल्यावर, " हा खरोखरच प्रल्हाद आहे " असे ते म्हणाले. पुढे त्यांना श्रीदादांनी परमार्थातील काही गोष्टी विचारल्या. त्यांनी काही सांगितल्या. आणि भविष्यदर्शी श्रीनागाप्पाण्णामहाराज बोलून गेले " प्रल्हादा, तुम्हाला श्रीनिंबरगीकरमहाराजच अन्य गोष्टी सांगतील." येथे हे लक्षात घ्यावे: यावेळी निंबरगीकरमहाराज विद्यमान नव्हते. त्यांचे निर्याण होऊन ५३–५४ वर्षे झालेली होती. तरी आपल्या अतुल सामर्थ्याने त्यांनी श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे वचन खरे करून दाखविले.

निंबरगीकरमहाराजांनी बोध सुरू केला :

चिमडहून श्रीदादा सांगलीस परतले. काही काळानेच श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे भविष्यवचन प्रत्यक्षात आले. इ.स. १९३९ सालातील पौष शुद्ध नवमीचा दिवस होता. श्रीदादा तापाने आजारी होते. आपल्या घरच्या सोप्यावरील अंधाऱ्या खोलीत त्यांचा बिछाना होता. संध्याकाळचे सहा वाजले. तोच खोलीतील पश्चिमेकडच्या भितीतील खांबाजवळ निंबरगीकरमहाराज साक्षात् उभे आहेत असे

श्रीदादांना दिसले. श्रीदादांना उद्देशून त्यांनी "येनू इल्लदानू" हे कानडी पद चालीत उच्चारले. पदाचे पठण संपताच श्रीदादांनी निंबरगीकरमहाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवले. निंबरगीकरमहाराज अंतर्धान पावले. आणि येथपासून ज्या पद–अभंग इत्यादींनी गुरुलिंगगीता सिद्ध झाली आहे ती काव्यसंपत्ति श्रीदादांना "श्रुत" होण्यास सुरवात झाली. ही पदे जसजशी श्रवणपुटात आली तसतशी श्रीदादांनी ती लेखनबद्ध करून ठेवली.

निंबरगीकरमहाराज, गुरुलिंगजंगम व सिद्धानंद :

निंबरगीकरमहाराजांचे जन्मनाम नारायण असून ते गुरुलिंग तसेच गुरुलिंगजंगम या नावांनीही प्रसिद्ध होते. त्यांनी गुरुलिंगजंगम या स्वत:च्या स्वरुपात काही पदे श्रीदादांना 'श्रुत' केली तर त्यांनीच 'सिद्धानंद' हा अवतार घेऊन काही पदे श्रीदादांचे कानी सुपूर्त केली. आणि नारायणराव निंबरगीकरमहाराजांनी म्हणजे गुरुलिंगजंगमानी श्रीदादांच्यासाठी म्हणजे 'प्रल्हादाचे' साठी "सिद्धानंद हा अवतार घेतला" असे गुरुलिंगगीता सांगते (गुलिंगी, ६६·१). सिद्धानंद म्हणजे गुरुलिंगांचा अवतार, असे गुरुलिंगगीतेत (४६·४; २७·१; २३·४; ४७·२) अन्यत्रही म्हटले आहे. श्रीगुरुलिंगजंगम हे शिवस्वरुप आहेत. (गुलिंगी, ५१·१; १८·१). साहजिकच गुरुलिंगांचा अवतार असणारे सिद्धानंद हेही शिवस्वरूपच आहेत. (गुलिंगी, ४७·३; ६५; २६·३; १२·६; ३७·६)

गुरुलिंगगीतेचे स्वरुप :

गुरुलिंगजंगम व सिद्धानंद यांनी गुरुलिंगगीता प्रल्हादाला नादरूपाने दिल्याने ती 'श्रुति' ठरते (गुलिंगी ४३·१; ४०·१-२; ४२·५; ४३·३). श्रुतिस्वरूप असणारी गुरुलिंगगीता ईश्वर स्वरूप आहे असे गुरुलिंगगीता (४९·२) सांगून टाकते.

गुरुलिंगगीता श्रीदादांना श्रुत होऊ लागण्यास श्रीनागाप्पाण्णा-महाराजांचे वचन कारणीभूत झाले, हे गुरुलिंगगीतेनेही (४३·३; ६६·१) उल्लेखिले आहे. नागाप्पाण्णामहाराजांच्या वचनाप्रमाणे "येनू इल्लदानू" या पदापासून "छळकोट छळी छी" पर्यंतची पदे श्रीदादांना प्राप्त झाली. इ. स. १९४८ च्या मे महिन्यात श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे अधिकारी चिरंजीव श्रीगुरुसिद्दप्पामहाराज सांगलीस श्रीदादांच्याकडे आले. त्यांचे "नमो नमो गुरुलिंगजंगमेशा" हे ध्रुवपद असणारे पद काही केल्या पूर्ण होत नव्हते. यावेळी श्रीदादांच्या इच्छेप्रमाणे निंबरगीकरमहाराजांच्या प्रेरणेने हे पद दि. २९–५–४८ या दिवशी पूर्ण झाले व ते त्यांनी दुसरे दिवशी म्हणजे वैशाख वद्य ७, शके १८७० या दिवशी श्रीदादांना वहीत लिहून दिले. तेव्हा श्रीदादा त्यांना म्हणाले "यापुढे वैशाख वद्य ७ हाच दिवस मी गुरुलिंगगीता जयंतीचा मानणार व हेच पद सर्व प्रथम म्हणणार". ते मान्य करून श्रीगुरुसिद्दप्पामहाराज अंतःप्रेरणेने पुढे बोलले "रामभाऊ, तुम्हाला आणखी पदे मिळणार नाहीत कशावरून?" त्यांच्या या वाक्यातील गर्भित अर्थानुसार, श्रीदादांना "रामेश्वरल्ली सोमेश्वरु" येथपासूनचे पुढील सर्व काव्य मिळत गेले.

गुरुलिंगगीतेची नांवे :

प्रस्तुतची गीता 'नारायण–गीता' म्हणता येईल; कारण निंबरगीकरमहाराजांचे नाव नारायण होते. ते सिद्ध असल्याने, 'सिद्धगीता' हे नावही योग्य ठरेल. या गीतेतील बराच भाग सिद्धानंदानी उच्चारला असल्याने, 'सिद्धानंद–गीता' हे नाव अयोग्य नाही. यातील काही भाग प्रल्हाद उच्चारतो अशी भूमिका असल्याने, 'प्रल्हादगीता' हे नावही अयोग्य ठरणार नाही. तथापि प्रसन्न झालेल्या श्रीगुरुलिंगानी म्हणजेच गुरुलिंगजंगमांनी ही गीता सांगितली असल्याने, या गीतेतच 'जंगमप्रसादगीता' (गुलिंगी, २२·३), 'गुरुलिंगप्रसादगीता' (गुलिंगी, ४०·२), आणि

'गुरुलिंगगीता' (गुलिगी, ४६·३; ६०·२; ६६ चे ध्रुवपद) ही तीन नावे येतात त्यांतील 'गुरुलिंगगीता' हे नाव सुटसुटीत आहे.

गुरुलिंगगीता प्राप्तीची पद्धती :

श्रीगुरुलिंगगीता श्रीदादांना क्रमाक्रमाने मिळत गेली. त्या संदर्भात पुढील गोष्टी लक्षणीय आहेत. (१) गुरुलिंगगीतेतील पदे एकाच ठराविक वेळी श्रीदादांना श्रुत झाली असे नाही. पहाट (उदा.– निम्नविग येनू), सकाळ (उदा.– एडलावंद), दुपार (उदा.– जीवात्मवु केडम्यु) संध्याकाळ (उदा.– येनू इल्लदानू), वा रात्र (उदा.– हनुमंत सद्गुरु नम्म) यांपैकी कोणत्याही वेळी ही पदे त्यांना ऐकू येत. (२) दोन पदे सोडता, गुरुलिंगगीतेतील इतर अभंग श्रीदादांना आपल्या घरीच मिळाली. हे दोन अपवाद असे– (अ) श्रीदादा काही काळ सांगली संस्थानच्या ट्रेझरी ऑफिसात नोकरी करीत होते. ते ट्रेझरी ऑफिसात असताना, श्रावण शुद्ध १, शके १८७३, शुक्रवार दिनांक ३–८–५१ रोजी दुपारी १२ वाजता त्यांना नादरूपाने 'रामेश्वर नी' हे पद मिळाले, त्यात चार कडवी होती. हेच पद दुसरे दिवशी पाच कडव्यांचे व शब्द थोडे वेगळे या स्वरूपात मिळाले. (आ) इ. स. १९५६ च्या मे महिन्यामध्ये श्रीदादा पालघर येथे गेले होते. तेथे माईसाहेब दाढेकराच्या विठ्ठल मंदिरात त्यांची कीर्तने चालू होती. तेथे असताना दि. २६–५–५६ रोजी पहाटे ५–३० वाजता श्रीनिंबरगीकरमहाराज प्रगट झाले आणि त्यांनी 'निम्नविग येनू' हे पद श्रुत केले. (३) गुरुलिंगगीतेतील बहुतेक काव्य श्रीदादा एकटे असताना त्यांना मिळाले. या गोष्टीला पुढील तीन अपवाद आहेत: (अ) आश्विन शुद्ध १२ शके १८६३, गुरुवार दि. २–१०–१९४१ रोजी श्रीदादा आपले पितृदेव श्रीमामामहाराज यांच्या कीर्तनात बसले असताना, त्यांना 'समाधान शांतीवु' हे पद ध्वनिरूपाने ऐकू आले. (आ) ट्रेझरी ऑफिसात श्रुत झालेल्या पदाचा उल्लेख वर आला आहे. (इ) दि. २४–१–१९५३ रोजी श्रीदादांच्या घराच्या सोप्यावरील अंधाऱ्या

खोलीत श्रीदादा, श्री. धनंजय भावे व श्री. ब. म. बापट असे बसले होते. अचानक तेथे सौम्य प्रकाश पडला व पंधरा मिनिटांत तो गेला तेवढ्या वेळात श्रीदादांना काकडारती आणि शेजारती ऐकू आली. या तीनही प्रसंगी इतरांना मात्र काहीच ऐकू आले नाही. (४) गुरुलिंगगीतेची पहिली दोन पदे मिळाल्यावर, दि. २१-१-१९३२ रोजी श्रीदादांनी निंबरगीकरमहाराजांना प्रार्थना केली. "महाराज, आपण कृपावंत होऊन मला कानडी अभंगांत बोध केलात. आता माझे मुखाने कानडी अभंग बोलवा". महाराज बोल म्हणाले. आणि त्याप्रमाणे दि. २७-१-१९३९ रोजी श्रीदादांच्या मुखातून 'नारायणा अर्थवु' हा अभंग प्रगट झाला. पुढेही अशी अनेक पदे त्यांच्या मुखातून प्रगटली. अशा पदांत दासराम वा प्रल्हाद अशी मुद्रिका आहे. ही पदे श्रीदादा उच्चारीत आहेत ही भूमिका असल्याने त्यामध्ये (प) कधी श्रीदादांच्या कुलदेवतांचा उल्लेख आहे, तर(फ) कधी निंबरगीकरमहाराजांच्यानंतर त्या संप्रदायात झालेल्या अनेक साधुसंतांची व अधिकारी पुरुषांची नावे आहेत.(५)गुरुलिंगगीतेतील काही पदे निंबरगीकरमहाराज व सिद्धानंद यांनी साक्षात प्रगट होऊन उच्चारली; काही पदे भगवान् शिवाच्या व सोमेश्वराच्या अदृश्य-रूपातून ध्वनित झाली. (६) 'जगवू मुट्टीवू' हे पद श्रीदादांना प्रथम प्रकाशाक्षर स्वरूपात दिसले व नंतर ते ध्वनिरूपाने ऐकूही आले.(७) श्रीदादांच्या घरी येऊन एका सिद्ध पुरुषांनी म्हणजे निंबरगीकर-महाराजांनी 'ह्यांगयन्नो', 'छायछुरांग' आणि 'आचरणन' प्रत्यक्ष येऊन दिली. (८) 'नमो नमो गुरुलिंगजंगमेशा' हे पद गुरुसिद्ध्यामहाराजांनी श्रीदादांना दिले.

गुरुलिंगगीता : भाषा आणि विषय :

निंबरगीकरमहाराज हे कानडी भाषिक असल्याने त्यांनी दिलेली बहुतेक पदे कानडी भाषेत आहेत. तथापि काही पदे इंग्रजी, आर्ष, संस्कृत व मराठी या भाषांतही आहेत.

गुरुलिंगगीतेच्या काव्यात पद, अभंग, श्लोक, आरती, भजन अशी विविध पद्यरचना आहे. त्यातील काही भजने व श्लोक हे प्रचारात आहेतच. काही पदांत नमन आहे; एका पदात मानसपूजा आहे; तर काही पद्यांत विविध संख्येचे जप आहेत. खेरीज गुरुमहिमा, सांप्रदायिक संतांचे स्मरण असे अनेक भाग आहेत.

गुरुलिंगगीतेच्या काही पद–अभंगांतून प्रासंगिकपणे तत्त्वज्ञान, आचार, साधन व साक्षात्कार याविषयीची वचने आलेली आहेत. त्यातील काही भाग पुढे दिला आहे.

अंतिम तत्त्व आणि जगत् :

आपल्या सभोवती अफाट विश्व आहे. "या विश्वाच्या उत्पत्तीला कर्ता असा कोणी नाहा; ती हरीचे ठिकाणी कल्पनेने निर्माण झाली आहे. आज जे शब्दाचे स्वरूप दिसते आहे ते वास्तविक आजही नाही किंवा ते कोठून आलेही नाही व येणे शक्य नाही; ते चांचल्यधर्माने स्वयंसिद्ध आहे म्हणून भासमान होते आहे. वाटले तर त्यास आहे म्हणावे नाहीतर नाही म्हणावे (गुलिंगी, १६·१–२). विश्वात दिसणाऱ्या नाना प्रकारच्या पदार्थात आत्मा आहे. विश्वात द्वैत आहे पण आत्म्याचे ठिकाणी द्वैत नाही. म्हणून महाराज म्हणतात "आत्मस्वरूप सर्वत्र आहे; तेथे द्वैत नाही (गुलिंगी, १२·५). या शरीरात आत्मस्वरूप रामकृष्णगतीत संथ झालेले आहे" गुलिंगी, १०·२). आणि आत असणाऱ्या या आत्म्याला वा 'ईश्वराला साक्षी ठेऊन अणु, रेणु, वृक्ष इत्यादी आपापले कार्य करीत असतात (गुलिंगी, ५·३). माणूसही स्वतः काही करीत नाही. परमेश्वरच सर्व काही करीत असतो; म्हणून सर्व काही परमेश्वरच आहे'. (ईश्वरी संदेश, १,८,९,).

भासमान होणारे हे विश्व नाहीच. 'हे काही नाहीच आहे' (गुलिंगी, २·१). दिसणारा वा भासणारा प्रत्येक पदार्थ नाहीच

(ईश्वरी संदेश, २). विश्वात सर्वत्र भेद आहे; जीव व शिव असाही भेद केला जातो. वस्तुत: 'जीव–शिव नाहीतच' (गुलिगी, ४६·२). जीव जन्माला आले व गेले असे वाटते; पण तेही बरोबर नाही. "जीवात्मा हा उत्पन्न झालेला नाही; त्याला नाशही नाही; कारण तो वस्तुत: आत्मरूपच आहे". (गुलिगी, २·२).

खरे म्हणजे सर्वत्र व्याप्त असणारा एक आत्मा (=ब्रह्म शिव, हरि) हा एकमेव सत्य आहे. 'ब्रह्मस्वरूप हे आलेले किंवा झालेले नाही; ते स्वयंसिद्ध आहे' (गुलिगी, १२·२). अस्तित्व हे आत्म्याचे वा ईश्वराचे स्वरूप आहे: 'अस्तित्व म्हणजेच परमेश्वर' (ईश्वरी संदेश, १०). सद्रूपाने शिव सर्वत्र व्याप्त आहे; तो घनदाट निश्चळ व नि:शब्द आहे (गुलिगी, २४·१); परमेश्वर हीच पूर्ण वस्तु आहे (ईश्वरी संदेश, २९). दृश्यादृश्याचे आत शिव हा आनंदरूपाने आहे गुलिगी, २४·३).

संक्षेपाने सांगायचे झाल्यास, आत्मा (=ब्रह्म, शिव, ईश्वर) हे एकच तत्त्व सत्य आहे व तो सच्चिदानंद आहे. गुलिगगीता (२·१) सांगते : सत्य एक चिदानंद आत्मा आहे.

आचार :

जीव हा मुळात आत्मरूप आहे. जीवाने शिवात मिसळून जाणे हेच त्याच्या जीवनाचे ध्येय आहे. जीवाचे स्वरूप मुळात आनंद आहे. पण चालू जीवनात त्याला सुखदु:ख भोगावे लागते. आणि जे सुख वाटते तेही दु:खरूप होते. एवंच या "प्रपंचात सुख नाही" (प्रसादबोधगीता, २५·१). आता, आत्मप्राप्तीसाठी प्रयत्न करताना,, 'द्वैत हे आपल्या नाशाला कारणीभूत आहे' (गुलिगी, ५·२) हे जाणून, "मी–तू तु–तुझे सोडावयास हवे" (गुलिगी २·१). या बाबत आपण शब्दशास्त्राला भुलू नये. "शब्दशास्त्राची पोकळ

बडबड सोडून कुसंगतीपासून अलिप्त रहावयास हवे" (गुलिंगी, ८·२). चिंता आणि अहंकार हे तापदायक असल्याने, 'मनांत चिंता करु नये' (प्रसादबोधगीता, ७·१); अहंकाररूपी असुर जावयास हवा (स्मरणगीता, ७·३). मग हळु हळु आसक्ति कमी करावयास हवी. 'मायिक स्वरूपाच्या दुष्ट संगातील प्रेम काढून टाकावयास हवे' (गुलिंगी, ४·३). ईश्वरप्राप्तीसाठी सद्गुरूंचे मार्गदर्शन घेऊन, 'गुरुपदी भ्रमर होऊन गुंग व्हावे' (गुलिंगी, २·३). आणि 'सर्व संगातून अलिप्त होऊन गुरूंनी सांगितलेले गोड नामामृत सेवन करावे' (गुलिंगी, ५·४).

साधन :

अपात्र मनुष्य गुरुमंत्र मिळूनही कोरडा ठणठणीत रहातो (गुलिंगी, १७·४). तेव्हा पात्र माणसाने गुरूंनी सांगितलेले साधन करावयास हवे. "साधन केल्याने हा जन्म शेवटचा होतो (प्रसादबोधगीता, ७·१). शिवमंत्र अखंड जपावयास हवा (गुलिंगी, ३६·४). शिवस्मरणाच्या मार्गाने जीवशिवांचे ऐक्य होते (गुलिंगी १९·४). महाराज सांगतात "नामाची साखर घे आणि परब्रह्माला पहा" (गुरुलि, ८·१). हे नाम काया-वाचा-मनीकडचे आहे (गुलिंगी, ६·२). नाम हे गतिरूप आहे; ज्या गतीवर साधक स्वार होतो ती गति त्याने एकाग्रतेने संथ अशी वहाती ठेवावयास हवी (गुलिंगी, ५·१). रामकृष्णहरी हा मंत्रमय मार्ग धरावयास हवा (गुलिंगी, ३·२). जीवात्म्याचे ठिकाणी जो नाश पावण्याचा धर्म आहे तेथे जागे व्हावयास हवे (गुलिंगी, ११·१). या देहात चंद्रसूर्य-गतींचे ठिकाणी द्वैतरहित होण्याचे दुर्गम ठिकाण-किल्ला-आहे. (गुलिंगी, १६·५). अशाप्रकारे, साधनाने 'चित्त स्वस्थ झाल्यावर मग आत्मवस्तु दिसते (गुलिंगी, २०·१). शरीरात सहस्रदल-कमलस्थानी आत्मसाक्षात्कार होत असल्याने, त्या 'सहस्रारगिरीवर जावयास हवे' (स्मरणगीता, ७·३).

साक्षात्कार :

आत्म्याचा साक्षात्कार नाद आणि प्रकाश या स्वरूपात होतो. म्हणून महाराज सांगतात 'आत वळून आत्म्याला नादबिंदुरूपाने पहा' (गुलिगी, २·२). ते पुढे सांगतात "वायुगतीचा पूर्ण निरोध करून चार देहाचे पलीकडे असलेली चित्प्रभा पहा (गुलिगी, १७·११); दोन भुवयांच्या मध्ये साक्षिरूप आत्म्याला पहा (गुलिगी, १७·९); चिदाकाशात निःशब्द असे परिपूर्ण ब्रह्म पहा' (गुलिगी, ६·४). साक्षात्काराचे संबंधात गुरुलिंगगीता आणखी सांगते: "रामकृष्ण हरिनामाचे ठिकाणी हरित प्रकाशाने शिवात्मा दृग्गोचर होतो (गुलिगी, २९·२). रामकृष्णगतीत असणाऱ्या आकाशात तेजोरूप शिवात्मा अहंकारविरहित वायुरूप गुहेत प्रगट होतो (गुलिगी, २७·३). सूर्य-चंद्र जेथे एक होतात, त्या बिंदुमात्र विवरात जो प्रकाश आहे त्याचे आता अग्निस्वरूप आत्म्याचा लोटच लोट आहे; तेच पीतप्रभायुक्त आत्मतेज आहे (गुलिगी, ७·४). आकाशाचे आत असणाऱ्या वायूचे ठिकाणी आत्म हा अग्निरूपात तेजाने दैदीप्यमान होतो (गुलिगी, २८·२). सहस्रदलस्थानात अग्निस्वरूप आत्म्याचे लोटच लोट दिसतात" (गुलिगी, २९·४). सहस्रदलस्थानात आत्मसाक्षात्कार झाला की मनुष्य 'निरिच्छ व निष्काम होतो' (गुलिगी, ११·२); तो आत्मरूप होऊन जीवन्मुक्त होतो. त्यांच्या जीवनाची सार्थकता होते.

गुरुलिंगगीतेतील नादानुसंधान :

उपनिषदे सांगतात: मनामुळे बंध व मोक्ष आहेत. चंचळ मन बंधात पाडते तर निश्चळ मन मोक्षप्राप्ति करून देते. मनाची चंचळता नष्ट होणे म्हणजेच मनाचा नाश वा लय होणे. मनाचा लय झाला की कैवल्य अथवा ब्रह्म उरते (ब्रह्मबिंदु, २; महोपनिषद् ४·१०१; योगाशिखा, ६·५८; मैत्रायणी, ६·२४; शांडिल्य, १·४०). नित्यजपगीताही तेच सांगते (२). मनोलय होण्यास नादानुसंधान हा

उत्कृष्ट उपाय म्हटला जातो. म्हणून नादानुसंधानाचा अभ्यास करावा (नादबिंदु उप. ३८,४१). नादानुसंधानाच्या अभ्यासास उपयोगी पडतील अशी अनेक पदे, भजने गुरुलिंगगीतेत आहेत. उदा.– हर ॐ हर ॐ (मंत्रगीता, २२), सांब सदाशिव (प्रसादबोधगीता, ४४), श्रीनारायण गुरुनारायण (प्रसादबोधगीता, ४७; जयजयकारगीता, २४). अशाच नामजपाच्या गीता आहेत.

गुरुलिंगगीतापठणाचे फळ :

अशाप्रकारे, 'बोधामृताची गंगा असणारी' (गुलिंगी, ६०'१) ही गुरुलिंगगीता परमार्थमार्गी पुरुषाला उपयुक्त ठरणारी आहे. तसेच, "जर या प्रसाद–वचनांचे तू पठण करशील तर अगणित पुण्य मिळवून तू जगतात धन्य होशील" (गुलिंगी, १७'६) अशी पठणाची फलश्रुतिही गुरुलिंगजंगममहाराजांनी सांगितलेली आहे.

के. वा. आपटे

सांगली
दिनांक ७।९।१९८५

भगवान श्री सद्गुरु श्रीनिंबरगीकर महाराज श्रीक्षेत्र निंबरगी



स्वयेची आले श्री तुकाराम वाणी ।
म्हणोनी तया नाम हे निलबाणी ॥
दिली दिव्यवाणी गुरुलिंगगीता ।
नमी राम हा श्री गुरुलिंगनाथा ॥

– श्री दासराम

श्रीगुरुलिंग गीता अर्थ

[१]

हे गुरुलिंगजंगमेशा, तुला नमस्कार असो ॥ ध्रु ॥ तू नामरहित असून तुझ्या नामाचे नारायण नामाइतके माहात्म्य आहे. त्या तू या भवाचा लौकरच आपल्या निजधामांत नेऊन शेवट कर ॥ १ ॥ हे सर्वेशा, करवीरक्षेत्री वास करणाऱ्या श्रीकाडसिद्धेशा, भक्तांचा भाव पहा ॥ २ ॥ शरण आलेल्यांना वर देणाऱ्या व चिमडक्षेत्री वास्तव्य करणाऱ्या दानशूर श्रीरघुनाथप्रिया, श्रीगुरुनाथा, तुला नमस्कार असो ॥ ३ ॥ श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज यांचे शिष्यवरा, साधुपुरुषा, चिमडांत वास करणाऱ्या श्रीरामचंद्रा, तुला नमस्कार असो ॥ ४ ॥ हिंचगेरीशा, श्रीगुरुनामनिवासा, साधकेशा, गुरुश्रेष्ठा, भाऊराया तुला नमस्कार असो ॥ ५ ॥ हे श्रेष्ठ साधनी पुरुषा, श्रीनागाप्पाण्णा, आपल्या निरंजनरूपाचे चरणी श्रीगुरुसिद्दण्णा आहे, त्या तुला नमस्कार असो ॥ ६ ॥

[२]

अरे, हें कांहीं नाहींच आहें. मग तू व तुझें हें कशाला पाहिजे ? सत्य एक चिदानंद आत्माराम तेवढा आहे. अरे बाळा, जीवात्मा हा कांहीं उत्पन्न झालेला नाही; तो वस्तुतः आत्मरूपच असून त्याचें ठिकाणीं उत्पत्ति व नाश नाही. म्हणून त्याला

नादबिंदूरूपाने आंत वळून पहा. हे रामा, हा बोध लक्षांत घे. व गुरुनामाचे प्राशन करून गुरुपदकमलाचे ठिकाणी पूर्णचंद्राचे प्रकाशासारखा ज्यांचा प्रकाश आहे अशा त्या तेजस्वी पदांचे ठिकाणीं भ्रमर होऊन गुंग होऊन रहा.

[३]

शेषशायी भगवान् तुझे पुढे प्रगट झाले आहेत. मला गोड असे तूं कांहीतरी दे म्हणजे तुला मी हरिभक्तीचे तत्त्व सांगतो. पाण्यासारखें असें जे कांहीं शुद्धस्वरूप आहे त्या ठिकाणीं हा ब्रह्मानंद झाला आहे. हा परमार्थ चांगला म्हटला आहे. म्हणून तूं रामकृष्णहरी वासुदेव हा मंत्रमय मार्ग धर. आकाशाचें ठिकाणी हा आनंद प्रगट झाला आहे. हे तत्त्व तुम्ही आम्ही सर्वांनी श्रीगुरुकृपेनें जाणलें पाहिजे.

[४]

तुझ्या व माझ्या कष्टाने लहान मोठया सर्व ठिकाणी घनानंदरूपाचें आंत एक आत्माच कसा आहे हें ओळखून तूं त्यालोच धर. आणि भक्ति जाणलेला असा तूं चित्स्वरूपाचे ठिकाणी एकरूप हो. सिद्धपदाचे ठिकाणी ऐक्य पावून मायिक स्वरूपाच्या दुष्ट संगांतील प्रेम काढून टाक. हे बाळा रामा, तू खरोखरीच धन्य असून सिद्धानंदस्वरूपाचे ठिकाणी तूं परिपूर्ण आहेस.

[५]

स्वार लोक हे अगदीं संथपणानें आणि एकाग्रतेनें आपली वहाने हाकतात. त्याप्रमाणे ज्या गतीवर तू स्वार झाला आहेस ती गति एकाग्रतेने संथ अशी वहाती ठेव. आणखी एक तुला सांगतो ते ऐक. द्वैत हे आपल्या नाशाला कारणीभूत आहे. ईश्वराला साक्षी ठेऊन

अणु, रेणु, वृक्ष इत्यादि आपली कार्ये करतात. सर्व संगापासून अलिप्त होऊन तू हें गोड नामामृत सेवन कर आणि भगवान् श्रीमद्गुरु काडसिद्धांचे हे वचन ऐक.

[६]

रामकृष्णहरी हे वचन धर आणि सर्व जगाला हरीनामाचे मार्गाने पोचव. जर कोणी शरण येईल तर कायेच्या व सर्वांच्या पलीकडे असलेले व सर्वांना जेथें प्रवेश करता येत नाही असे जे एकतत्त्व नाम–जे कायेला व मनाला प्राप्त न होणारे, त्याचे पलीकडे असलेलें व नाम–सांग कमलमार्गाचा अवलंब करून सिद्धासनाने स्थिर हो. आणि कामाची राखरांगोळी करून आत्म्याचे ठिकाणीं आत्मरूप हो. अणुपरमाणूत व्याप्त असलेल्या आकाशांत श्रीहरीचा प्रकाश भरला आहे हे जाणून चिदाकाशांत म्हणजे रामकृष्णतत्त्वांचे पोकळीत निःशब्द असे परिपूर्ण ब्रह्म पहा. दोन भुंवयामध्ये असलेल्या डोळ्यांत जो गुरुमंत्र आहे त्यांत प्रकाश पहा आणि याच देहांत त्या ठिकाणी आढळणाऱ्या प्रणवरूपांत भगवान् शंकराचें दिव्य तेज पहा. आकाशाचें ठिकाणी घनदाट श्रीगुरुदेव व्याप्त आहेत. त्या ठिकाणी, हे रामा, तू आनंदाचे सेवन कर.

[७]

तुझे साधन जवळ जवळ परिपूर्ण झाले असून पूर्ण साधनापैकी एक शेषसाधन राहिले आहे. तेव्हां तू जगाचा उद्धार करावयास पाहिजे आहेस. हरीस्वरूपांत एकरूप होऊन त्या तत्त्वाशी तू समरस झाल्याने तुझ्या जन्माचे सार्थक झाले आहे; म्हणून मोठा संतोष पावून श्रीगुरुलिंगजंगममहाराज तुझेपुढे प्रगट झाले आहेत. आमचे तुमचे हे आता सरले असून हे मनोविकार शून्याचे आत येऊच शकत नाहीत. या शून्याचे ठिकाणी दिव्यस्वरूपाची चमक असून ते तेज सर्वघटी व्याप्त आहे. सूर्यचंद्र जेथे एक होतात त्या बिंदुमात्र विवरांत

जो प्रकाश आहे त्याचे आंत अग्निस्वरूप आत्म्याचा लोटच लोट आहे तेच पीतप्रभायुक्त आत्मतेज आहे हे तू प्रल्हादा नीट ऐक.

[८]

सिद्धवचनामृताचे प्राशन करून रामकृष्ण बोल. आणि याप्रमाणे नामशर्करास्वरूप परब्रह्माला, हे बंधो, पहा. (किंवा नामाची साखर घे व परब्रह्माला पहा). सारभूत प्रणवस्वरूप आहे. त्या प्रणवरूपवेदांस रात्रंदिवस मनांत वागवून, शब्दशास्त्राची पोकळ बडबड सोडून कुसंगतीपासून अलिप्त रहा. श्रीक्षेत्रनिंबरगी येथील हरीकृष्णवासुदेव-मंत्राचा राजमार्ग चांगला आहे. मी–तू–पणा सरल्याने मुक्तस्थितीत गेलेल्या दासरामापुढे श्रीसद्गुरु प्रगट झाल्यानें त्यांस ब्रह्मानंद झाला आहे.

[९]

हे श्रीसदगुरुराया, तुम्ही अर्थरूपाने बोध दिलात आणि माझेकडून साधनाचा आचार करवून घेतलात. मोह, काम आणि क्रोध यांचा नाश करून जगात आढळून येणारे वैराग्य माझे अंतरात प्रगट केले. फार काय लौकरच सर्व पापाचे निर्मूलन करून माझे हृदयात वासहि केला तेव्हा, श्रीहनुमंता, जेथे माझे हृदयात तू वास केलास तेथे आता शरण यावयाचे म्हणजे काय ? व शरण येण्याची जरुरी तरी काय ? आता या दासरामावर कृपा कर.

[१०]

तुझे उपाधीभूत शरीरातील सर्व आशापाश तोडून टाकले आहेत. तर आता तू भक्ती आणि भाग्य मिळवून देशील काय ? या शरीरात खेळणारे स्वरूप किती गोड आहे की जे रामकृष्णगतींत संथ झाले असून त्या ठिकाणी आनंदरूपाने प्रगट झाले आहे. त्यांस पहावयास कां उशीर ? वायुरूपांतील गुहेत मी जे कांही बाळगून

ठेवले आहे. ते तू साध्य करशील असे मला पटते आहे. तर तू आत चल. तुला कायेतील गुहेत आशिर्वाद देतो. या शरीरात सिद्धानंद-वचनामृत परिपूर्णरीतीने असून त्या योगाने चिदाकाशाचे ठिकाणी असलेल्या श्रीगुरुपदी तूं एकरूप हो.

[११]

जीवात्म्याचे ठिकाणी जो नाश पावण्याचा धर्म आहे तेथेच तू जागा हो. आणि या देहात असलेल्या गुरुभक्तीत तल्लीन हो नाही कसे ? निःशब्दाचा एक शेष जरी घेतला तरी त्या ठिकाणीं काही पाहिजे असे उरतच नाही म्हणजे इच्छाच रहात नाही. व क्षरतत्त्व हे अक्षरात विराम पावून जीवात्मा व शिवात्मा हा मोठा भेदच शिल्लक रहात नाही. हे रामा, शून्याचे पलीकडे निरशून्य चिदाकाशांत आहे ते तू पहा.

[१२]

हे बाळा, या आकाशाचे आत श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज प्रगट झाले आहेत. त्या गुरुस्वरूप परब्रह्माला वेगाने पहा. या ठिकाणी, अकार, उकार, मकार हे नसून याचे अतीत मग या रीतीने राहिलेले वर उल्लेखिलेले ब्रह्मस्वरूप हे आलेले किंवा झालेले असे कधीहि नाही, ते स्वयंसिद्ध आहे. साक्षिरूप आत्म्याच्या योगाने गुरुऋण पहा. आणि त्यायोगे अर्थरूप होऊन घनदाट निःशब्दस्वरूप हो. ॐकार हा चिदाकाशात झाला आणि चिदाकाश हे चंचळ असून गतिमान आहे असे म्हटले गेले आहे. सर्वत्र असलेले जे आत्मस्वरूप त्याठिकाणी मी–तू–पणाच उरत नाही. हे प्रल्हादा, गुरुलिंगजंगमांचे ठिकाणी तू परिपूर्णच होतो आहेस ज्या पूर्ण स्वरूपाचे ठिकाणीं ही अपूर्ण अशी चिद्रूप माया निर्माण झाली आहे त्या सिद्धानंदप्रभूपदाचें सेवन कर.

[१३]

या देहांत समाधान हे शांतीचे ठिकाणी हरिरूपाने प्रगट होत असून ते नाद, बिंदू, कला व ज्योती या चिद्मूल तत्त्वाने–म्हणजे ज्याचे मूळ चैतन्य आहे. त्या योगाने–चार रूपाने प्रगट होते. गुरूप्रसादांत जे समाधान दडले आहे. ते कृपा करताच डोळ्यांत पाहताच मिळालेले आहे, त्रिगुणात्मक मायेचे पलीकडे जे विवर (नादरूप) आहे (आत्म्याचा आवाज) त्या पलीकडे मस्तकाचे ठिकाणी स्वयंभू शिवाची वस्ती आहे. त्या श्रीशंकराचे प्रेरणेने मी तुझ्यावर कृपा करतो. कुठेहि प्राप्त न होणारे समाधान तुला गोविंदरायांच्या रामकीर्तनांत प्राप्त होते आहे. त्यापुढे हृदयांत होणारा घंटीनाद क्षुद्रच समजला पाहिजे.

[१४]

हे प्रल्हादा, तू या रीतीने गुहेच्या प्राकारांत असलेल्या सूर्यप्रकाशाचा अनुभव घेण्याची शैली शिकलास ती कळा किती गोड आहे. या शरीरात कोहंच्या धारणेत जो निळिमा आहे. त्याचे आत असलेल्या तेजात सोहं धारणेचा दिव्य नीलप्रकाश असून त्या ठिकाणी देहाचे भान–जे प्रथम सोहं धारणेत येताना संथ झालेले असते ते–गलित होणार आहे. या गुहेत चार देहाच्या होणाऱ्या नादरूप कोटाचा (किल्ल्याचा) भेद करून ये. (नुसते चत्वार देहाचे निरसन करून भागत नाही). आणि मग देवाच्या दयेने ही शिवनामाची वल्ली पहा. सिद्धांचा प्रभू शंकर त्याने हें नवल केले असून, मस्तकाचे ठिकाणी गुहेत नेऊन, प्रल्हादा, तुला त्याने ही खूण सांगितली आहे.

[१५]

हे पांडुरंगा, आता तरी तूं माझे चित्तात रंगाला ये. रक्त आणि श्वेत यांचे पलीकडे तूं हरितरूपाने प्रगट असून शून्याचे ठिकाणी असलेल्या कोहं धारणेत निळसर आभासरूपाने व्यक्त असून सोहंच्या धारणेत नीलप्रकाशयुक्त पीतप्रभेने प्रगट आहेस. महाशून्याचे

गुहेत भक्ताची व तुझी ऐक्यता होत आहे. म्हणून देवा, तुझ्याशी ऐक्य पावून हा जन्म आता अखेरचा झाला आहे. तेव्हा देवा तू आता प्रल्हादाचे ठिकाणी वसती कर अशी सिद्धानंद तुला प्रार्थना करतो आहे.

[१६]

